श्रीमती स्वाती मंगेश शिंदे,सहाय्यक सरकारी अभियोक्ता, गट-अ यांना निलंबनानंतर सेवेत <u>पुन:स्थापित करुन नियुक्ती देण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक :- डीपीपी-०८१७/प्र.क्र.१९५/पोल-१०
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:-११ जुन, २०१९

<u>वाचा</u> :- संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक सअनि/१२२/७८७/२०१९, दिनांक २४.०४.२०१९.

<u>शासन आदेश :-</u>

श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, माझगांव कोर्ट, शिवडी, मुंबई येथे कार्यरत असताना त्यांच्याविरुध्द गु.र.क्र.२३/२०१७ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये दाखल करण्यात आला होता. त्यास अनुसरुन श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना समक्रमांक, दिनांक १८ सप्टेंबर, २०१७ च्या आदेशान्वये दिनांक २८ जुलै, २०१७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने निलंबित करण्यात आले होते. तसेच, त्यांचे विरुध्द समक्रमांक दिनांक २६ ऑक्टोंबर, २०१८ अन्वये अभियोग दाखल करण्यास मान्यता देण्यात आली होती.

श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना निलंबित करुन १ वर्षापेक्षा अधिकचा कालावधी झाला असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. अभियो-१३१४/प्र.क्र.८६/११-अ, दिनांक ३१.०१.२०१५ अनुसार गृह विभाग, शासन निर्णय, क्र. ऐसीबी-०२१५/प्र.क्र.८४/पोल-२, दिनांक ०९.०३.२०१५ अन्वये अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली गठित समितीच्या बैठकीत, श्रीमती शिंदे यांच्या निलंबनाचा आढावा घेण्यात आला. आढाव्याअंती समितीने श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता (निलंबित) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणी निकालाच्या अधीन राहून पुन्हा सेवेत घेऊन त्यांची अकार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात यावी, असा निर्णय एकमताने घेतला आहे. आता, श्रीमती स्वाती मंगेश शिंदे यांची रत्नागिरी जिल्ह्यातील रिक्त असलेल्या सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पुर्व मान्यतेने सदर नियुक्ती करण्यात येत आहेत.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. श्रीमती स्वाती मंगेश शिंदे यांनी सहाय्यक सरकारी अभियोक्ता या पदाचा कार्यभार तात्काळ स्वीकारावा. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता संचालक, अभियोग संचालनालय यांनी खालील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

अ) श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना नियुक्तीसाठी रत्नागिरी जिल्हा प्रस्तावित करण्यात आला असून या जिल्ह्यात त्यांची कोठेही पदस्थापना संचालक, अभियोग संचालनालय यांनी करावी.

ब) श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता ह्या नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजु करुन घ्यावे. तसेच, याबाबतचा अहवाल तात्काळ शासनास सादर करावा.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असुन, त्याचा संगणक संकेतांक २०१९०६१११७०३५९३१२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.06.11 17:08:23 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

- श्रीमती स्वाती मंगेश शिंदे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता (संचालक, अभियोग संचालनालय, म.रा., मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१. संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. राज्यमंत्री (गृह)(शहरे) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (गृह)(ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (अ. व सु.), यांचे स्वीय सहाय्यक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
७. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी
९. संबंधीत सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता (संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत)
१०. निवड नस्ती/पोल-१०.